क्र. मुअ (प्रशि.) / को. प्र. के./ CSR / No - 1140                    दि.- 9 OCT 2024

# CSR प्रशिक्षणार्थी कागदपत्रे पडताळणी करीता सुचना – २०२४

३×६६० मेवॅ, कोराडी प्रकल्प बाधित गावातील उमेदवाराना सामाजिक उत्तरदायित्व योजने अंतर्गत दस्ताऐवज पळताळणी बाबत.

म.रा.वि. निर्मिती कंपनीच्या ३×६६० मेगावॅट कोराडी प्रकल्पबाधीत गावातील आय. टी. आय. धारक उमेदवारांकरीता सामाजिक उत्तरदायित्व योजने अंतर्गत प्रशिक्षण योजना राबवण्यात येत असून महानिर्मिती कंपनीच्या प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८८ दिनांक १९.०८.२०१७ मधील तरतुदीच्या अधीन राहून मुख्य कार्यालयाचे पत्र क्रमांक ९८६६ दिनांक २५.०९.२०२४ च्या अनुषंगाने प्रशिक्षणार्थी म्हणून प्राप्त उमेदवारांकडून कोराडी प्रशिक्षण केंद्राच्या www.ktcmahagenco.com संकेतस्थळावर दिनांक २७.०९.२०२४ ते ०१.१०.२०२४ या कालावधीत ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने उमेदवारांनी ऑनलाइन पोर्टलवर नोंद केल्यानुसार शालान्त (एस. एस. सी.) परीक्षेत प्राप्त गुणानुक्रम (Merit) नुसार दि. ०३.१०.२०२४ रोजी ७३४ उमेदवारांची यादी कोराडी प्रशिक्षण केंद्राचा Website वर प्रसारित करण्यात आली होती. त्यापैकी अनुक्रमांक 3०१ ते ५५० उमेदवाराना कागदपत्रे पडताळणीकरीता दिनांक ११.१०.२०२४ व अनुक्रमांक ५५१ ते ७3४ उमेदवाराना कागदपत्रे पडताळणीकरीता दिनांक १३.१०.२०२४ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.३० पर्यंत कोराडी प्रशिक्षण केंद्र, कोराडी येथे स्वखर्चाने बोलावण्यात येत आहे त्या करीता महानिर्मिती कुठलाही प्रवास भत्ता अथवा प्रतिपूर्ती करणार नाही उमेदवाराने कागदपत्रे पडताळणी करीता येताना मूळ दस्ताऐवज व त्यांची स्वयंसाक्षांकित (Self Attested) एक छायांकित प्रत संच ( One Xerox Set ) सोबत आणावी.

खालील १५५ उमेदवारांना (एस.एस.सी.) परीक्षेत प्राप्त गुणानुक्रम (Merit) नुसार प्रशिक्षणाकरीता महानिर्मितीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्राथम्य देण्यात येईल. मात्र त्यापैकी उमेदवार कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी गैरहजर अथवा योग्य कागदपत्राच्या अभावी अपात्र ठरल्यास त्यांच्या ऐवजी (एस.एस.सी.) परीक्षेत प्राप्त गुणानुक्रम (Merit) नुसार प्रतीक्षा यादीमधील उमेदवारांचा विचार करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| अनुक्रमांक | दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|
| ३०१ ते ५५० उमेदवाराची प्रतीक्षा यादी | ११.१०.२०२४ (शुक्रवार)<br>सकाळी १०.३० वा. ते दुपारी ०५.३० वाजे पर्यंत | कोराडी प्रशिक्षण केंद्र, कोराडी |
| ५५१ ते ७३४ उमेदवाराची प्रतीक्षा यादी | १३.१०.२०२४ (रविवार)<br>सकाळी १०.३० वा. ते दुपारी ०५.३० वाजे पर्यंत | कोराडी प्रशिक्षण केंद्र, कोराडी |

टिपः-

१. उमेदवाराना केवळ कागदपत्रे पडताळणी करीता बोलविण्यात येत असून कागदपत्रांची पूर्तता करणे ही उमेदवाराची जबाबदारी आहे.
२. केवळ कागदपत्रे पडताळणीकरिता बोलावण्यात आल्यामुळे उमेदवारांना प्रशिक्षणाचा दावा करता येणार नाही.
३. प्रशासकीय कारणास्तव सदरहु प्रशिक्षण कुठल्याही टप्प्यावर अंशता किंवा पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार महानिर्मिती प्रशासन राखून ठेवत आहे.

09-10-24

मुख्य अभियंता (प्रशि)
कोराडी प्रशिक्षण, केंद्र, कोराडी